<u>महापार ऑनलाईन कार्यमूल्यमापन अहवाल प्रणालीबाबत</u>

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१८/प्र.क्र.५८/प्रशा-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ मार्च, २०१८.

<u>संदर्भ</u> - शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएफआर-१२११/प्रक्र.१३/तेरा, दिनांक १५.१२.२०१७

<u>शासन निर्णय</u> -

महापार (MahaPAR) या ऑनलाईन कार्यमूल्यमापन अहवाल नोंदविण्याच्या प्रणालीत सन २०१७-१८ पासून सर्व गट "अ" आणि गट "ब" (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने संदर्भाधीन शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५.१२.२०१७ अन्वये, या महापार प्रणालीत कार्यमूल्यमापन अहवाल नोंदविण्यासाठी सबंधित सेवेतील गट-अ व ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांसाठी त्यासेवेचे नियंत्रण करणारे सह सचिव/उप सचिव यांना "समन्वय अधिकारी" तसेच "संवर्ग नियंत्रण अधिकारी (Cadre Controlling Authority) म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे संबंधित सेवेचे नियंत्रण करणाऱ्या मंत्रालयातील संबंधित कार्यासनांचे अवर सचिव/कक्ष अधिकारी यांना "माहिती व्यवस्थापक" (EMD Manager) घोषित करण्यात आले आहेत. या शासन परिपत्रकान्वये समन्वय अधिकाऱ्यांवर काही जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. त्यामधील मुख्य जबाबदारी म्हणजे, अतिरिक्त परिरक्षकांसाठी विभागीय/प्रादेशिक स्तरावर एका प्राथमिक परिरक्षकांची (Primary Custodian) नियुक्ती करणे. संबंधित सेवेतील गट-अ व ब(राजपत्रित) अधिकाऱ्यांचे "कोषागार/उपकोषागार निहाय किंवा कार्यालय निहाय युनिट" [Organization Unit (OU)] निश्चित करणे. तसेच प्रत्येक OU तील अधिकाऱ्यांचे (अधिकाऱ्यांच्या संख्येनुसार) कार्यमूल्यमापन अहवाल तयार करणेसाठी एका अतिरिक्त परिरक्षकाची (Alternate Custodian) नियुक्ती करणे ही आहे.

२. त्यानुसार कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय व त्या अधिनस्त कार्यालयांकरीता पुढीलप्रमाणे, Organization Unit (OU) निश्चित करण्यात येत असून, प्रत्येक OU तील अधिकाऱ्यांचे (अधिकाऱ्यांच्या संख्येनुसार) कार्यमूल्यमापन अहवाल तयार करणेसाठी अतिरिक्त परिरक्षकाची (Alternate Custodian) व प्राथमिक परिरक्षकांची नियुक्ती करण्यात येत आहे-

अ.क्र.	Organization Unit (OU)	अतिरिक्त परिरक्षक (Alternate Custodian)	प्राथमिक परिरक्षक (((Primary Custodian)
१.	कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनाय, नवी मुंबई	संचालनालयातील आस्थापना हाताळणारे सहायक संचालक	उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनाय, नवी मुंबई
२.	विभागीय मुख्यालय, मुंबई	सहायक संचालक, विभागीय मुख्यालय, मुंबई	उपसंचालक, विभागीय मुख्यालय, मुंबई
३.	विभागीय मुख्यालय, पुणे	सहायक संचालक, विभागीय मुख्यालय, पुणे	उपसंचालक, विभागीय मुख्यालय, पुणे
४.	विभागीय मुख्यालय, नाशिक	सहायक संचालक, विभागीय मुख्यालय, नाशिक	उपसंचालक, विभागीय मुख्यालय, नाशिक
५.	विभागीय मुख्यालय, औरंगाबाद	सहायक संचालक, विभागीय मुख्यालय, औरंगाबाद	उपसंचालक, विभागीय मुख्यालय, औरंगाबाद
६.	विभागीय मुख्यालय, नागपूर	सहायक संचालक, विभागीय मुख्यालय, नागपूर	उपसंचालक, विभागीय मुख्यालय, नागपूर
७.	विभागीय मुख्यालय, अमरावती	सहायक संचालक, विभागीय मुख्यालय, अमरावती	उपसंचालक, विभागीय मुख्यालय, अमरावती

३. महापार प्रणालीमध्ये विविध स्तरावर कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या संदर्भाधीन शासन परिपत्रक, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या सोबतच्या परिशिष्ट “फ” मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत. त्यानुसार अतिरिक्त परिरक्षकांनी कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३१७१३२२०९९००३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sangeeta Ajit Shinde

Digitally signed by Sangeeta Ajit Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba607066e7a34e428b7c7c73de0f7e09a315a2af5075fd47f1e08389aa137b81, cn=Sangeeta Ajit Shinde
Date: 2018.03.17 13:24:58 +05'30'

(संगीता अ. शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
२) सर्व उपसंचालक, विभागीय मुख्यालय, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
३) सर्व सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
४) सामान्य प्रशासन विभाग (१३), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) निवडनस्ती (प्रशा-२)